ePaper
║ वर्ष - 8 । अंक - 213 ║ UDYAM-MH-26-0158827 ║
महाईन्यूज™

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार सुरेश धस यांच्या पाठिशी



### आतील पानांत

- आयपीएल २०२५ चे वेळापत्रक जाहीर!
- टीम इंडियाचा सध्या कागदावर मजबूत
- रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरी १८ मृत्यू
- जयललिता यांचे दागिने सरकारकडे


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 17 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### सरोज अहिरे यांना पूर्ण पाठिंबा : अजित पवार

# महायुतीमधील धुसफूस पुन्हा चव्हाट्यावर!

## » आमदार सरोज अहिरे यांची भर मंचावरून अजित पवारांकडे तक्रार

**। नाशिक । महाईन्यूज**

**नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सरोज अहिरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोरच भर मंचावर नाराजी व्यक्त केली. मित्रपक्षाच्या नेत्यांकडूनच आपल्याला त्रास दिला जात असल्याची तक्रार त्यांनी अजित पवारांकडे केली. यावेळी अजित पवार यांनी आपला सरोज अहिरे यांना पूर्ण पाठिंबा असल्याचं म्हटलं.**





महायुतीमधील धुसफूस पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सरोज अहिरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोरच भर मंचावर उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. “मला अनेक प्रकारचा त्रास झाला. माझ्या कामाचा श्रेय घेण्याचा प्रयत्न सुरु आहे”, असं सरोज अहिरे म्हणाल्या. तसेच भगूरमध्ये तुम्ही काम करु नका, असं देखील सांगितलं जात असल्याची खदखद सरोज अहिरे यांनी व्यक्त केली.

सरोज अहिरे यांच्या या तक्रारीनंतर अजित पवार यांनी आपण पूर्णपणे पाठिशी असल्याचं सांगितलं.

यावेळी अजित पवार यांनी सरोज अहिरे यांना संबंधित गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा देखील सल्ला दिला. पण सरोज अहिरे यांनी अशाप्रकारे जाहीरपणे मित्रपक्षाच्या नेत्यांबद्दल नाराजी व्यक्त केल्याने याबाबत राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे.

### सरोज अहिरे म्हणाल्या?

“अजित दादा असे अनेक प्रश्न आहेत ज्याने मला काम करायला त्रास होतो. व्यासपीठावरील हे सर्व राजकीय लोकं त्याचे साक्षीदार आहेत. कारण प्रत्येक ठिकाणी काम करायला त्रास होतो. मी काम मंजूर करुन आणायचं आणि परस्पर त्याचा श्रेय घेण्याचा प्रयत्न करायचा. पाठपुरावा तीन-तीन वर्षांचा किंवा दोन-अडीच वर्षांचा आहे. पण चार-सहा महिन्यांचं पत्र दाखवायचं आणि त्या कामचं श्रेय घेण्याचा प्रयत्न करायचा. हे सत्र गेल्या पाच वर्षातदेखील मी सहन केलं आहे”, अशी तक्रार सरोज अहिरे यांनी अजित पवार यांच्याकडे आपल्या भाषणात केली.

“आदरणीय दादा तुमचा माझ्यावर लहान बहीण म्हणून कायम प्रेमाचा हात डोक्यावर राहू द्या, अशी मी वारंवार विनंती करते”, अशीदेखील विनंती सरोज अहिरे यांनी केली. तसेच “कुठेतरी तशी शिस्त आपल्या मित्रपक्षाच्या लोकांना असली पाहिजे. हा वादविवाद घडवण्यात काही अर्थ नाही”, असंदेखील सरोज अहिरे या उघडपणे म्हणाल्या. त्यांच्या या तक्रारीनंतर अजित पवार यांनी सरोज अहिरे यांची समजूत काढली.

### अजित पवार काय म्हणाले?

“सरोज दुसऱ्यांदा आमदार झाल्या आहेत. साहजिकच काम करताना असा कुणी त्रास दिल्यानंतर तू हळवी असल्यामुळे नाराजीने बोलत होती. पण चालतं, या गोष्टीला फार काही महत्त्व देऊ नकोस. आम्ही तुझ्या पाठिशी मजबुतीने आहोत. तुला कुठलीही गोष्ट कमी पडू देणार नाहीत, अशी ग्वाही तुझ्या मतदारांच्या साक्षीने देतो”, असं अजित पवार म्हणाले.

---

### पुण्यात शेकडो काँग्रेस कार्यकर्ते अचानक रस्त्यावर

## » पोलिसांचा मोठा बंदोबस्त; सरकारच्या विरोधात हल्लाबोल मोर्चा

**। पुणे । महाईन्यूज**

**पुण्यात युवक काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते आज अचानक रस्त्यावर उतरले आहेत. या आंदोलांकडून हल्लाबोल मोर्चा काढण्यात आला आहे. युवक काँग्रेसने राज्य सरकारच्या विरोधात हा हल्लाबोल मोर्चा काढला आहे. या मोर्चातून ‘नोकरी दो, नशा नहीं’ अशी घोषणाबाजी केली जात आहे.**





पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे. पुण्यात शेकडो युवक काँग्रेसचे कार्यकर्ते हे अचानक रस्त्यावर उतरले आहेत. या आंदोलकांकडून हल्लाबोल आंदोलन करण्यात येत आहे. ‘नोकरी दो, नशा नहीं’ अशी घोषणा आंदोलक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. काँग्रेस भवनपासून युवक काँग्रेस कार्यकर्त्यांचा मोर्चा निघाला आहे.

बेरोजगारीच्या विरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांना हा मोर्चा काढला आहे. या आंदोलनाबाबत एका कार्यकर्त्याने माध्यमांना प्रतिक्रिया दिली. “देशभरात युवक काँग्रेसकडून आंदोलन करण्यात येत आहे. लाखो, हजारो कोटींचे ड्रग्ज मिळाल्यानंतरही सरकारकडून कोणतीही कारवाई केली जाताना दिसत नाही. युवक नोकरी मिळत आहेत पण नोकऱ्या मिळत नाहीत. यामुळे आम्ही आज आंदोलन करतोय. आमच्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली आहे”, अशी प्रतिक्रिया एका आंदोलकाने दिली. “गेल्या 10 वर्षात सर्वाधिक बेरोजगारी वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्योगपती अदानी यांच्याकडचं लक्ष बाजूला सारुन देशातील तरुणांकडे बघत नाही, तोपर्यंत आम्ही आंदोलन करु. देशातील तरुणांना रोजगार मिळत नाही. ड्रग्जच्या विरोधात कारवाई होत नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन करणार.

### पोलिसांकडून आंदोलकांची धरपकड

आंदोलकांची गर्दी पाहता वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांनी तातडीने संबंधित परिसरात रस्त्यावर बॅरिकेट्स लावले. त्यानंतर आंदोलकांची धरपकड करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलक पुणे डेक्कनच्या दिशेला जात असताना बालगंधर्व चौकात पोलिसांनी आंदोलकांना अडवलं. यावेळी आंदोलक पोलिसांचं न ऐकता पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. पण पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केली.

# सक्रिय सदस्य नाही, निवडणुकीत संधी नाही!

## भाजपचे 1 कोटी 51 लाख प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दीष्ट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्षाचे सक्रिया सदस्य आणि सक्रिय सदस्यांची नोंदणी करणाऱ्यांनाच यापुढे संघटनेत आणि निवडणुकीमध्ये संधी मिळेल. कोण कोणाच्या जवळचा असला तरी, सदस्य नसल्यास संधी तिकिट मागण्याचीही संधी मिळणार नाही, अशी तंबी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी भाजप कार्यकर्त्यांना दिली.**



भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुणे विभागातील पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांसाठी संघटन पूर्व कार्यशाळ आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, विक्रांत पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले की, भाजपने १ कोटी ५१ लाख प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दीष्ट निश्चित केले आहे. त्यापैकी १ कोटी १६ लाख प्राथमिक नोंदणी पूर्ण झाली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील यशाच्या जोरावर हे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहेत. हे उद्दीष्ट फेब्रुवारी महिन्याअखेरपर्यंत साध्य करायचे असून त्यासाठी येत्या १९ आणि २० फेब्रुवारी रोजी पुन्हा एकदा घर चलो अभियान राबविण्यात येणार आहे. प्राथमिक सदस्य नोंदणी ही नेत्यांसाठी नाही तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयार असलेल्या कार्यकर्त्यांसाठी आहे. निवडमुकीत मतदान करणाऱ्या प्रत्येकाला पक्षाशी जोडून घेणे आणि त्याला भाजपचा सक्रिया सदस्य करून घेणे आवश्यक आहे. पक्षाच्या सक्रिय सदस्याला आणि सक्रिय सदस्यांची नोंदणी करणाऱ्यांना यापुढे संघटनेत आणि निवडणुकीमध्ये संधी मिळणार आहे. सदस्य नोंदणीचे उद्दीष्ट पूर्ण झाले तर पश्चिम महाराष्ट्रातील सर्व महापारै, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती अध्यक्ष महायुतीचे निवडून येतील.दरम्यान, बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख, मंडल अधिकारी ही आपली ताकद आहे.

### घर चलो अभियान राबविण्यात येणार

त्यापैकी १ कोटी १६ लाख प्राथमिक नोंदणी पूर्ण झाली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील यशाच्या जोरावर हे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहेत. हे उद्दीष्ट फेब्रुवारी महिन्याअखेरपर्यंत साध्य करायचे असून त्यासाठी येत्या १९ आणि २० फेब्रुवारी रोजी पुन्हा एकदा घर चलो अभियान राबविण्यात येणार आहे. प्राथमिक सदस्य नोंदणी ही नेत्यांसाठी नाही तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयार असलेल्या कार्यकर्त्यांसाठी आहे. निवडमुकीत मतदान करणाऱ्या प्रत्येकाला पक्षाशी जोडून घेणे आणि त्याला भाजपचा सक्रिया सदस्य करून घेणे आवश्यक आहे. पक्षाच्या सक्रिय सदस्याला आणि सक्रिय सदस्यांची नोंदणी करणाऱ्यांना यापुढे संघटनेत आणि निवडणुकीमध्ये संधी मिळणार आहे. सदस्य नोंदणीचे उद्दीष्ट पूर्ण झाले तर पश्चिम महाराष्ट्रातील सर्व महापारै, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती अध्यक्ष महायुतीचे निवडून येतील.दरम्यान, बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख, मंडल अधिकारी ही आपली ताकद आहे. त्यावर विधानसभा निवडणुकीत यश मिळाले आहे.

त्यावर विधानसभा निवडणुकीत यश मिळाले आहे. त्यामुळे नेत्यांनी दिलेले उद्दीष्ट यापुढेही पूर्ण करावे लागणार आहे, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुणे विभागातील पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांसाठी संघटन पूर्व कार्यशाळ आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, विक्रांत पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले की, भाजपने १ कोटी ५१ लाख प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दीष्ट निश्चित केले आहे.

# घरी बसून राजकारण करता येत नाही!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांना टोला

। मावळ । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**‘राजकारण हे मैदानात उतरून करावे लागते. तेव्हा यश मिळते. राजकारण घरी बसून करता येत नाही,’ असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावला.‘श्रीरंग आप्पा बारणे सोशल फाउंडेशन’च्या वतीने शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त ‘संघर्षयोद्धा’ पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते रविवारी झाले.**



त्या वेळी ते बोलत होते. चिंचवड येथे झालेल्या कार्यक्रमाला श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त स्वामी गोविंदगिरी महाराज, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार विजय शिवतारे, सुनील शेळके, महेंद्र थोरवे, राहुल कुल, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे उपस्थित होते.‘राजकारणात ‘तुम लडो हम कपडे संभालते है,’ अशी अवस्था चालत नाही. नेता खंबीरपणे पाठीशी उभारणारा पाहिजे,’ असे सांगून शिंदे म्हणाले,‘राजकारण हे समाजसेवेचे माध्यम आहे. आम्ही लोकांसाठी राजकारण, समाजकारण करत असून, खुर्चीसाठी करत नाही. पदे, येतात जातात, वर-खाली होतात. मी कधीच स्वतःला मुख्यमंत्री समजलो नाही. सामान्य माणूस होतो. आता ‘डेडिकेटेड टू कॉमन मॅन’ आहे. लाडक्या बहिणीचा लाडका भाऊ ही ओळख माझ्यासाठी सर्वात वरची आहे. सरकारने सुरू केलेली एकही योजना बंद केली जाणार नाही.’‘सत्तेला लाथ मारून आम्ही सर्वांनी उठाव केला. ४० आमदार माझ्यासोबत आले. मला पुरस्कार मिळाल्याने अनेकांना पोटदुखी झाली आहे. तीन वर्षे झाले, तरी पोटदुखी थांबत नाही,’ असा टोला खासदार संजय राऊत यांना लगाविला. हिंदुत्वाला, शिवसेनेला, बाळासाहेबांच्या विचारांना ज्यांनी डॅमेज केलं. एकनाथ शिंदे हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे यांच्या संघर्ष पुरुष पुस्तकाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार शंकर जगताप यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते विधानसभेत ज्याप्रमाणे आम्हाला विजय मिळाला. तसाच आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये महायुतीचा विजय होईल.

### ऑपरेशन टायगर वगैरे काही नाही

उद्धव ठाकरे यांचा अनेक जण पक्ष सोडत आहेत. दोन-चार माणसं सोडली तर कोणीही खुश नाही. असा खोचक टोला भास्कर जाधव यांच्या नाराजीनंतर एकनाथ शिंदे यांनी लगावला आहे. आम्हाला शिव्या शाप देण्यापेक्षा कार्यकर्ते, नेते आपल्याला का सोडून जात आहेत? याचं आत्मपरीक्षण आणि आत्मचिंतन करावं. अशी टीका यावेळी शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली. जो विकास विरोधी आहे. त्याला कार्यकर्ते सोडून जात आहेत. आमच्या पक्षात स्वतःहून अनेक जण येत आहेत. आमचं हे टायगर ऑपरेशन वगैरे काही नाही. असे स्पष्टीकरण देखील एकनाथ शिंदे यांनी दिलं.

## जाहिरात होर्डिंगचे सर्वेक्षण केले जाणार

# होर्डिंगवर आता ‘एआय’ची नजर!

## अनधिकृत, धोकादायक होर्डिंगवर तत्काळ कारवाई केली जाणार

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आकाश चिन्ह व परवाना विभागाकडे पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नसल्याने शहरातील अनधिकृत, परवानगीपेक्षा अधिक आकाराच्या जाहिरात होर्डिंगचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे (एआय) सर्वेक्षण केले जाणार आहे. सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) तत्वावर ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. अनधिकृत, धोकादायक होर्डिंगवर तत्काळ कारवाई केली जाणार आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात एक हजार १३५ अधिकृत होर्डिंग आहेत. तर, शंभर होर्डिंग धारकांचे परवाना नूतनीकरण झालेले नाही. अत्याधुनिक ‘एआय’ आधारित प्रणालीद्वारे शहरात असलेले आणि नव्याने उभारले जाणाऱ्या जाहिरात होर्डिंगवर देखरेख, नियंत्रण ठेवले जाणार आहे. आकाशचिन्ह व परवाना विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्याने सर्वेक्षणाकडे दुर्लक्ष केले जात होते. ‘एआय’ या प्रणालीमुळे या कामासाठी लागणाऱ्या वेळेमध्ये आणि खर्चात बचत होणार आहे. शहरात अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करणे सुलभ होणार आहे. आवश्यक ठिकाणी होर्डिंग उभारता येणार आहेत. या खासगी संस्थेला वाढलेल्या उत्पन्नातून १५ टक्के रक्कम महापालिका देणार आहे. संस्था हे काम दहा वर्षे करणार आहे. ‘एआय’ प्रणालीमध्ये अत्याधुनिक लेसर कॅमेरे बसवण्यात आले आहेत. विद्युत वाहनाद्वारे शहरातील सर्व होर्डिंगचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी ‘ड्रोन’चाही वापर केला जाणार आहे. सर्वेक्षणामध्ये शहरातील सर्व होर्डिंगचे ३६० अंश कोनातून छायाचित्र घेतले जाईल. ज्यामध्ये होर्डिंगची जमिनीपासून उंची, लांबी, रुंदी, धोकादायक स्थिती, होर्डिंग अधिकृत आहे की अनधिकृत अशी माहिती जमा केली जाईल. त्याचे विश्लेषण करून आकाशचिन्ह व परवाना विभाग कार्यवाही करणार आहे. ‘एआय’ प्रणालीद्वारे होर्डिंगची नेमकी व तंतोतंत माहिती मिळणार आहे.

त्यामुळे उत्पन्नात भर पडणार आहे. अधिकृत किंवा अनधिकृत होर्डिंग कोणते, ते स्पष्ट होणार जाहे. त्यासाठी जागेवर जाऊन पाहणी करण्याची आवश्यकता असणार नाही. त्यामुळे वेळ व खर्चामध्ये बचत होणार आहे.

### होर्डिंग परवाना ऑनलाइन

होर्डिंग परवाना प्रक्रिया ऑनलाइन होणार असल्याने होर्डिंगधारकांना कार्यालयामध्ये यावे लागणार नाही. ती माहिती संग्रही राहणार असल्याने नूतनीकरणासाठी दरवर्षी कागदपत्रे उपलब्ध करून द्यावे लागणार नाहीत. प्रत्येक होर्डिंगची ३६० अंश कोनातून माहिती जमा झाल्याने त्यात परस्पर बदल करता येणार नाही. अनधिकृत होर्डिंगचा शोध घेणे सुलभ होणार आहे. ही प्रक्रिया ऑनलाइन व कागदविरहित असल्याने प्रशासन आणि होर्डिंगधारकांच्या वेळेची, पैशांची बचत होणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी सांगितले.

---

## रावेतमधील आवास योजनेतील लाभार्थ्यांना किवळेत सदनिका

### 15 मार्चपर्यंत संमतीपत्र सादर करण्याचे महापालिकेद्वारे आवाहन

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रावेत येथील आवास योजनेचा प्रकल्प रद्द केल्यानंतर या प्रकल्पातील लाभार्थ्यांना आता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतर्गत प्राप्त होणाऱ्या किवळेतील सदनिका देण्यात येणार आहेत. या एका सदनिकेची किंमत १३ लाख ७१८ रुपये आहे. या दरामध्ये ज्या लाभार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे, त्या लाभार्थ्यांनी १५ मार्चपर्यंत संमतीपत्र सादर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.**



किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ७५५ सदनिका उभारण्यात येत आहेत. या सदनिका आता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रावेत प्रकल्पातील निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. या ७५५ सदनिकांपैकी ३७८ सदनिका सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना, २२६ सदनिका इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांना, ९८ सदनिका अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना, ५३ सदनिका अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत, तर ३८ सदनिका या अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव असणार आहेत.


रावेत प्रकल्पातील लाभार्थी हे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या धोरणानुसार संमतीपत्र देऊन या सदनिकांचा लाभ घेऊ शकणार आहेत. लाभार्थ्यांनी झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाकडे संमतीपत्र सादर करावे. या संमतीपत्राचा मसुदा लाभार्थ्यांनी झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाच्या कार्यालयातून घ्यावा आणि आवश्यक माहिती भरून सादर करावा. लाभार्थ्यांना सदनिकांचा लाभ घेताना संमतीपत्रासोबत आवश्यक कागदपत्रेही सादर करावी लागणार आहेत. त्यानंतर महापालिकेचे निकष पूर्तता करणाऱ्या अर्जदारांनाच किवळे प्रकल्पातील सदनिका वाटप करण्यात येणार आहे. याशिवाय सदनिका हस्तांतरणाबाबतच्या प्रक्रियेमध्ये बदल करणे, या प्रक्रियेला स्थगिती देणे अथवा रद्द करण्याचे अधिकार महापालिकेने राखून ठेवल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले.




### संमतीपत्रासोबत जोडावी लागणार कागदपत्रे

तीन लाखांपर्यंतचा उत्पन्न दाखला, अर्जदाराचे जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, अर्जदार व कुटुंबातील सदस्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक छायांकित प्रत, मतदान ओळखपत्र, भाडेकरार, संमतीपत्र, वीजबिल, रहिवासी प्रमाणपत्र संमती पत्रासोबत जोडावे लागणार आहे. किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या ७५५ सदनिका उपलब्ध होणार आहेत. या सदनिका रद्द झालेल्या रावेत प्रकल्पातील पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

## संत सांगतील तसे वागावे



ज्या स्थितीत परमात्मा ठेवतो त्यात आनंद मानावा. प्रपंचातल्या दु:खाबद्दल वाईट वाटून घेऊ नये. आपण जगात वागताना सर्व 'माझे, माझे' असे म्हणतो, पण प्रत्यक्ष आपल्या वाटणीला किती येते याचा कधी आपण विचार करतो का ? मिळण्याची आणि मिळविण्याची हाव वाढल्यामुळेच आपल्याला खरे दु:ख होते. ही हाव नाहीशी व्हायला भगवंताच्या स्मरणात राहणे हा एकच उपाय आहे. मी भगवंताचा आहे ही जाणीव ठेवून वागावे. भगवंताकडे चित्त गुंतवून ठेवणे हाच खरा धर्म मानावा. जगाला फसवू नये आणि जगाकडून फसले जाऊ नये.

नामात जो राहिला तो सत्संगतीत राहिला. व्यवसाय आणि हौस याप्रमाणे आपण संगत धरतो. मनाची आणि नामाची संगत जोडून द्यावी. मालकाच्या बरोबर असलेला कुत्रा ज्याप्रमाणे धीट होऊन दुसऱ्यावर भुंकतो, त्याप्रमाणे आपण भगवंताच्या आधाराने राहावे; भुंकू मात्र नये, नेहमी लीनता ठेवावी. 'मी' साधन करतो हे विसरून जावे; त्याबद्दल अभिमान धरणे म्हणजे साधनाला कमीपणाच आणणे आहे. आपल्या कामात लक्ष ठेवून सर्वांशी प्रेमाने वागावे. स्त्री दीराचा किंवा सासू-सासऱ्यांचा मान ठेवते, ते नवऱ्याला खूश करण्याकरिता; तसे, भगवंताला ज्या रीतीने समाधान होईल, त्याप्रमाणे आपण वागावे. डॉक्टरला जर आपण 'त्या काळ्या बाटलीतले औषध मला का देत नाही ?' असे म्हटले तर तो ज्याप्रमाणे 'तुला तो रोग नाही' असे उत्तर देतो त्याप्रमाणे संत ज्याची त्याची वृत्ती ओळखून मार्ग सांगत असतात. याकरिताच संतांची संगत धरून, ते 'सांगतील' तसे वागावे; ते 'वागतात' तसे नाही वागू. आपल्या पतंगाची दोरी आपण संतांच्या हातात द्यावी आणि खुशाल निश्चिंत रहावे. आपण गुरूने सांगितलेले साधन करीत जावे, म्हणजे साधनात पुढे वाट दाखवायला तो उभाच असतो. जिथे दोन वाटा फुटतात, तिथपर्यंत या म्हणजे तिथे गुरू उभाच आहे. पण उगीच काही न करता 'पुढे काय आहे ?' हे विचारण्याने काय होणार? संतांनाच वेदांचा खरा अर्थ कळला. त्यांचे केवढे उपकार सांगावेत, की त्यांनी तो अर्थ आपल्याला सांगितला. म्हणून आपण वेद वाचण्याचे कारण नाही; आपण फक्त संत आपल्याला सांगतील त्याप्रमाणे वागावे. त्यात आपलेच घुसडू नये. आपले काम खात्रीने झालेच पाहिजे. पाणी गोठून बर्फ बनते, बर्फाच्या आत-बाहेर जसे पाणीच असते, तसे जो आत-बाहेर भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेला असतो त्याला संत म्हणतात. असे संत फक्त नामस्मरणाने जोडता येतात.

**बोधवचन : सद्गुरूच्या आज्ञेचे पालन करता करता साधकाला नामाची गोडी लागते, आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो.**

# येड्याची नडली संगत, मसणात बसली पंगत!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**आपल्याकडं एक प्रचलित म्हण आहे 'असंगाशी संग !' एखाद्या चुकीच्या माणसाबरोबर जर आपली मैत्री झाली, तर त्यातून काहीही उद्भवू शकतं. मग ती मानहानी असो, मोठा अपमान असो.. नाहीतर आर्थिक, मानसिक नुकसान असो..अशा असंगाशी संग केल्याचा फटका हमखास ठरलेला असतो ! खेडेगावात यालाच म्हणतात.. येड्याची नडली संगत..मसणात बसली पंगत !**

### किस्सा तंतोतंत लागू..अमरसिंग यांचा !


मूळ मुद्द्याला हात घालण्यापूर्वी याच अनुषंगानं थोडसं विषयांतर करतो. समाजवादी पक्षाचे एक दिवंगत नेते अमरसिंग यांचा किस्सा..समाजवादी पक्षाचे नेते मुलायम सिंग यांचा उजवा हात असणारे, त्या पक्षाचे सरचिटणीसही असणारे आणि नंतर पक्ष सोडून दुसरीकडं जाणारे अमरसिंग आठवा.. त्यांचा उल्लेख समाजवादी पक्षाचे 'चाणक्य' असा केला जायचा बरं का!

..तर हे अमरसिंग नंतर अमिताभ बच्चन, अनिल अंबानी यांचे जिगरी दोस्तही झाले. नंतर हळूच ते 'भाजपाई' बनले..पण, तिथे त्यांच्या बुद्धिमत्तेची डाळ शिजेना, कारण व्यवस्थित काड्या घालणे हा अमरसिंग यांचा मुख्य धंदा आणि राजकारण हा जोड धंदा! नंतर ते हळूच पुन्हा समाजवादी पक्षाच्या तंबूत शिरले. तोपर्यंत समाजवादी पक्षात उलथापालथ झाली होती आणि मुलायम सिंग यांना बाजूला करून अखिलेश यादव हे प्रमुख झाले होते. तिथं अखिलेश विरुद्ध त्यांचे काका शिवपाल यादव असा संघर्ष सुरू होता.

### प्रश्न अखिलेश बद्दल, उत्तर जया बच्चन बद्दल..

एके दिवशी अमरसिंग यांनी पत्रकार परिषद बोलावली होती. त्यात एका पत्रकारानं विचारलं, की अखिलेश आणि रामपाल यांच्यामध्ये संघर्ष सुरू आहे.. त्याला कारणीभूत अमरसिंग आहेत का ? या प्रश्नाला उत्तर द्यायचं त्यांनी टाळलं, आणि मूळ प्रश्नाला बगल देत उत्तर देऊन टाकलं, की अमिताभ आणि जया बच्चन हे गेली 22 वर्षे एकत्र राहत नाहीत, ते काय माझ्यामुळं ? थोडक्यात, अशा माणसाबरोबर मैत्री केल्याचा फटका अमिताभला बसला नसेल तरंच नवल !

### आता संजय राऊत आणि शरद पवार !



महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर हा किस्सा थोडक्यात सांगितला. महाविकास आघाडी स्थापन झाल्यापासून ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांच्या अनेकदा भेटीगाठी होताना दिसतात. इथंपर्यंत ठीक आहे..पण, संजय राऊत नावाच्या नेत्याची संगत किती वाईट हे शरद पवारांना आता कळून चुकलं असेल. उबाठा गटाचे कट्टर शत्रू म्हणजे एकनाथ शिंदे..या एकनाथ शिंदे यांचा मोठा सत्कार आणि पुरस्कार वितरण शरद पवार यांच्या हस्ते झालं. टाळके फिरले नसेल तर ते संजय राऊत कसले ? झालं..त्यांनी शरद पवारांवरच तोफ डागली..यालाच म्हणतात, असंगाशी संग.. हे स्वतः गाळात जाणार आणि बरोबर जी जी मंडळी आहेत, त्यांनाही घेऊन जाणार..पटतंय ना !

### शिंदेंबाबत पवारांचे गौरवोद्गार खटकले

शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला आणि त्यांचं कौतुक करणारे चार चांगले शब्दही वापरले. गेल्या काही वर्षात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांमध्ये फूट पडली आणि दोघांवर पराभवाची नामुष्की आली तरी पवार यांनी आकांडतांडव केला आहे, असे चित्र दिसलं नाही. या उलट संजय राऊत आणि उद्धव ठाकरे हे बेभान झाल्यासारखं बोलत आहेत आणि आणखी किती काळ बोलणार आहेत, हे माहीत नाही. हे दोन्ही गट प्रतिस्पर्ध्यावर टीका करतात, हे मान्य करू. पण, आता संजय राऊत यांनीच शरद पवारांना वेठीस धरणं ही बाब जरा आश्चर्यचकित करणारी आहे.

### संजय राऊत यांचे वाभाडे

शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला, त्याचे पडसाद सगळीकडं उमटले, संजय राऊत यांनी तर शरद पवार यांच्यावरच तोंडसुखच घेतले.

तथापि, शरद पवार यांच्या मनात नसताना देखील संजय राऊत यांचे परस्पर वाभाडे निघाले आहेत. आपल्या राज्यातील वाचाळ, तोंडाळ राजकारणी आणि बोलभांड प्रवक्ते सध्या बरेच शांत आहेत. पण, त्याला अपवाद संजय राऊत ठरले आहेत. त्यांची अवस्था पंक्चर झालेल्या गाडी सारखी आहे. काहीतरी दाखवायचं म्हणून किंवा काहीतरी छापायला हवं म्हणून संजय राऊत यांच्या बोलण्याला प्रसिद्धी मिळते, हे नाकारून चालणार नाही.

### सगळा आटापिटा ठाकरेंना खुश करण्यासाठी

आपल्या पक्षप्रमुखाला खूश करण्यासाठी स्वाभिमान किती गुंडाळून ठेवायचा, याला देखील मर्यादा असतात, हे संजय राऊत यांना समजायला हवं. उबाठा गट म्हणजे महाराष्ट्र समजणाऱ्या या बोलघेवड्या नेत्याला महाराष्ट्राचा अभिमान वगैरे भाषा म्हणण्याचा अधिकार आहे का ? बरं, तुझ्या पक्षाचं तू वाटोळं कर ना.. इतरांना ते हवंच आहे! मुद्दा शरद पवार यांच्या संदर्भातला आहे. त्यांच्या धोरणांवर टीका केली तरी त्यांचे ज्येष्ठत्व वादातीत आहे. ते भावनेत वाहणारं व्यक्तिमत्त्व नक्कीच नाही. अजूनही पहाटेपासून कार्यरत राहण्याची त्यांना संवय आहे आणि एखाद्या वाक्यानं किंवा हालचालीनं राजकीय संदेश धाडण्याचं त्यांचं कसब आहे, हे डबक्यात राजकारण खेळणाऱ्या संजय राऊत यांच्या मेंदूत शिरण्यापलीकडंच आहे. शिंदे यांचा सत्कार केला म्हणून कोणी आक्षेप घेईल, असं त्यांना माहित नसावं, असं म्हणता येत नाही, पण एक संदेश असा मिळाला, की 2019 मध्ये पवार यांनी जी काही स्ट्रॅटेजी आखली होती, ती 'वनटाईम' होती. तो ठाकरे किंवा संजय राऊत यांच्याशी केलेला दीर्घकालीन करार नव्हता. पवार हे अशा प्रकारचे राजकीय फलंदाज आहेत की ते गोलंदाज धावायला लागला की बॅट कशी फिरवायची ते ठरवत नाहीत, तर चेंडूचा टप्पा बघून बॅट घुमवतात. म्हणजे, मैदानात न खेळता देखील धावा काढण्याची कला त्यांना अवगत आहे, म्हणूनच कोणताही राजकीय पक्ष जिंकला तरी शरद पवार हे 'मॅन ऑफ द मॅच' आहेत, असं मानलं जातं, पण, हे संजय राऊत यांच्या डोक्यात घुसण्यापलीकडचं आहे.

### पवारांपुढं संजय राऊत किरकोळ

शरद पवार यांच्या तुलनेत संजय राऊत हे फार किरकोळ राजकीय खेळाडू आहेत. पवार यांनी गरज होती, तेव्हा त्यांचा व्यवस्थित उपयोग करुन घेतला.. ते त्यांचे राजकीय कौशल्य म्हणू या. पवार यांनी काय करावे आणि कोणाचा सत्कार करावा किंवा करु नये, हे संजय राऊत यांनी सांगावं आणि ते पवार यांनी ऐकावं, असं कधी घडेल का हो? अशी सुतराम शक्यता नाही. पवार यांच्याबरोबर पंगतीत बसण्याची संधी संजय राऊत यांना मिळाली खरी, पण ती पंगत पवार यांच्यासाठी होती, संजय राऊत यांच्यासाठी नव्हे!

### बाळासाहेब बनण्याचा प्रयत्न

वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांची मैत्री होती, तरीही दोघे एकमेकांचे राजकीय विरोधक होते. पवार यांच्या संदर्भात बाळासाहेब ठाकरे यांनी काही उद्गार काढले, तर ते खपून जायचे, पण असा अधिकार संजय राऊत यांनी स्वतःकडं घेणं मुळीच योग्य नाही. आता स्पष्ट सांगायचं तर पवार यांना उबाठा गटाची फारशी गरज उरलेली नाही. पवार यांना प्रवाहाच्या विरोधात कसं पोहायचं, हे संजय राऊत यांनी शिकवावं अशी वेळ नक्कीच आलेली नाही. पुन्हा एक खेड्यातली म्हण वापरावी लागते.. कुठं तो इंद्राचा ऐरावत आणि कुठं ती श्याम भटाची तट्टाणी !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# योग्यवेळी पर्दाफाश करणार!

## धस-धनंजय मुंडेंच्या भेटीवर फडणवीसांचे मोठे विधान

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणाचा भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्यासह अजून काही नेत्यांनी आवाज उठवला. यानंतर या घटनेतील आरोपींना पोलिसांनी अटक केलं. तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी तीन यंत्रणांच्या माध्यमातून सुरु आहे.**



दरम्यान, खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचे आणि मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे संबंध असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यावरून भाजपाचे नेते सुरेश धस यांनीही अनेकदा टीका केली. पण काही दिवसांपूर्वी सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आल्यामुळे चांगलंच राजकारण तापलं आहे. यावरून राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. यानंतर स्वतः सुरेश धस यांनी या भेटीबद्दल स्पष्टीकरणही दिलं. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याचे मान्य करत आपण त्यांच्या डोळ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीची विचारपूस करण्यासाठी भेटल्याचं सांगितलं. दरम्यान, सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. “कोण कोणाला भेटलं? यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही”, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे.कोण कोणाला भेटलं यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद सुरु राहिला पाहिजे. तसेच सुरेश धस यांनी मस्साजोगच्या प्रकरणात खंबीर भूमिका घेतलेली आहे. त्यांची भूमिका सर्वांनी पाहिली आहे. अशा प्रकारे खंबीर भूमिका घेत असताना कोणाशी संवाद तोडून टाकायचा असं करण्याची आवश्यकता नाही. कारण धनंजय मुंडे हे देखील राज्याचे मंत्री आहेत. मग एखादा आमदार एखाद्या मंत्र्यांना भेटला तर कोणताही फरक पडत नाही. तसेच सुरेश धस यांनी देखील सांगितलं आहे की धनंजय मुंडेंची भेट घेतली असली तरी कोणत्याही परिस्थितीत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे हाच हेतू समोर ठेवून काम करत आहेत. पण काही लोकांना असं वाटतं की सुरेश धस पुढाकार का घेत आहेत? यावरून त्यांच्या पोटात दुखतंय”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.“दोन गोष्टी एकत्र केल्या गेल्या. त्यामध्ये एक म्हणजे चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमच्या दोघांची लावलेली बैठक आणि मी

### लोकशाहीमध्ये संवाद सुरु राहिला पाहिजे

यावरून राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. यानंतर स्वतः सुरेश धस यांनी या भेटीबद्दल स्पष्टीकरणही दिलं. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याचे मान्य करत आपण त्यांच्या डोळ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीची विचारपूस करण्यासाठी भेटल्याचं सांगितलं. दरम्यान, सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. “कोण कोणाला भेटलं? यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही”, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे.कोण कोणाला भेटलं यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद सुरु राहिला पाहिजे.

धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी त्यांना भेटायला गेलो. या दोन्ही गोष्टी एकत्र झाल्या. चंद्रशेखर बावनकुळे यांची त्याबाबतीमधील प्रतिक्रिया झाली. त्यानंतर धनंजय मुंडेंना मी भेटल्याचंही ट्विवर आलं किंवा ते लीक करण्यात आलं. याबाबत माझं असं मत आहे की याबाबत कोणीतरी व्यवस्थित माझ्याविरोधात षडयंत्र रचतंय. हे षडयंत्र कोण रचतंय हे देखील मला माहिती आहे. ही गोष्ट मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर घालणार आहे. तसेच हे जे कोण षडयंत्र रचतंय त्याचा पर्दाफाश मी योग्यवेळी करणार आहे”, असं सुरेश धस यांनी म्हटलं होतं.खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचे आणि मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे संबंध असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यावरून भाजपाचे नेते सुरेश धस यांनीही अनेकदा टीका केली. दिवसांपूर्वी सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आल्यामुळे चांगलंच राजकारण तापलं आहे.

# आ. संदीप क्षीरसागर यांनी घेतली अजितदादांची भेट?

## अनेकांनी वेगवेगळे तर्कवितर्क लावल्यामुळे उलटसुलट चर्चा रंगल्या

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात चांगलंच राजकारण तापलेलं पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. असं असतानाच आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. आमदार संदीप क्षीरसागर यांनी अजित पवारांची जुन्नरमध्ये येऊन भेट घेतल्याने अनेकांनी वेगवेगळे तर्कवितर्क लावल्यामुळे उलटसुलट चर्चा रंगल्या.**



क्षीरसागरांनी जुन्नरमध्ये येऊन अजित पवारांची भेट का घेतली? याबाबत अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, त्यानंतर अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना या भेटीबाबत स्पष्टीकरण देत भेटीचं कारण सांगितलं आहे. “मला संदीप क्षीरसागर भेटले, पण त्यांच्या बीड शहरात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत ते मला भेटले”, असं स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिलं आहे.बीड नगरपालिकेचं वीज बील थकलेलं आहे. त्यामुळे एका जिल्ह्याच्या ठिकाणी २१ दिवसांनी पाणी पुरवठा होतो हे योग्य नाही. त्यामुळे संदीप क्षीरसागर तक्रार करत होते की यामधून काहीतरी मार्ग काढा. वीज बील थकलेलं आहे ते कनेक्शन सुरु करून त्यामधून आम्हाला मार्ग काढून द्या. त्यासाठी आमदार क्षीरसागर भेटायला आले होते. यापेक्षा दुसरे काहीही नाही. शेवटी कसं असतं की मी देखील

### राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

आजही आमची योजना तयार असताना वीज बील भरलं नाही म्हणून कनेक्शन जोडलेले नाहीत. मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध असूनही बीड शहराला १५ ते २० दिवसांनी पाणी मिळत आहे. ही अडचण मी अजित पवार यांना सांगितली आहे. तसेच या भेटीची कोणतीही गुप्तता पाळलेली नव्हती”, असं स्पष्टीकरण आमदार संदीप क्षीरसागर यांनी माध्यमांशी बोलताना दिलं आहे.गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात चांगलंच राजकारण तापलेलं पाहायला मिळत आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं.

विरोधी पक्षाचा आमदार होतो. तेव्हा माझंही काही काम असेल तर मी त्या ठिकाणच्या मंत्र्यांना जाऊन भेटत होतो. त्यामुळे यामधून दुसरा काही राजकीय अर्थ काढण्याची आवश्यकता नाही असं मला वाटतं. तसेच त्यांच्याबरोबर माझी दुसरी कोणतीही राजकीय चर्चा झालेली नाही”, असं स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आमच्या बीडच्या नगरपालिकेचा विषय फार गंभीर आहे. त्यासंदर्भाने मी अजित पवार यांची भेट घेतली आहे.

# रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरी 18 मृत्यू

## केंद्रीय रेल्वे मंत्री अश्वीनी वैष्णव यांच्या राजीनाम्याची मागणी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर काल (शनिवारी) रात्री चेंगराचेंगरी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर देशभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. तसेच विरोधी पक्षातील नेत्यांकडून केंद्र सरकारवर जोरदार टीका देखील केली जात आहे. विरोधकांकडून केंद्रीय रेल्वे मंत्री अश्वीनी वैष्णव यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे.**



शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी देखील या घटनेनंतर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी भाजपाचे अश्विनी वैष्णव राजीनामा देणार नाहीत कारण नैतिकताच शिल्लक राहिलेली नसल्याचे म्हटले आहे.वंदे भारत सारख्या रेल्वे गाड्यांचे श्रेय घेण्यासाठी भाजपाचे नेते पुढे असतात पण दिल्लीत घडलेल्या चेंगराचेंगरीची जबाबदारी घ्यायला ते मागे राहातात असेही दानवे म्हणाले आहेत. त्यांनी केलेल्या एक्स पोस्टमध्ये त्यांनी लिहिले आहे की, "वंदे भारतसारख्या गाड्यांचे क्रेडिट घ्यायचे असल्यास भाजपाचे नेते सश्यासारखे धावतात. पण दिल्ली सारख्या घटनांची जबाबदारी घेण्यासाठी यांची चाल कासावसारखी होते". इतिहासात प्रशासकीय व्यवस्थेची चूक असेल तर मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरणे देखील दानवे यांनी आपल्या पोस्टमध्ये दिली आहेत.लाल बहादूर शास्त्री, नितीश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत राजीनामा दिल्याचे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. "सिस्टिमची चूक असताना लाल बहादूर शास्त्री, नितीश कुमार नैतिक जबाबदारी घेऊन रेल्वेमंत्री पदाचा राजीनामा देऊ शकतात. ते भाजपाचे अश्विनी वैष्णव देणार नाहीत. कारण नैतिकता उरलेली नाही! मग जबाबदारी कसली?," असेही दानवे म्हणाले आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक लोकांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. मी शोकाकुल कुटुंबांप्रती माझ्या मनापासून सहानुभूति व्यक्त करतो आणि जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो. या घटनेमुळे पुन्हा एकदा रेल्वेचे अपयश आणि सरकारची असंवेदनशीलता समोर आली आहे. प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता, स्थानकावर चांगली व्यवस्था करायला हवी होती. सरकार आणि प्रशासनाने गैरव्यवस्थापन आणि निष्काळजीपणामुळे कोणालाही आपला जीव गमवावा लागू नये याची काळजी घ्यावी," अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिली.उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यासाठी दररोज लाखो भाविक दाखल होत आहेत. अशात काल रात्री नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर महाकुंभमेळ्याला जाण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी झाली होती. ही गर्दी अनियंत्रित झाल्यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीमध्ये १८ जणांचा मृत्यू झाला असून, १५ हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत.चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत रेल्वेकडूनही स्पष्टीकरण देण्यात आलं होतं. उत्तर रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी हिमांशू उपाध्याय यांनी एएनआयशी बोलताना सांगितले की, शनिवारी रात्री कोणतीही रेल्वे रद्द झाली नव्हती. फलाट क्र. १४ वर प्रयागराज एक्स्प्रेस येणार होती. प्रवाशी या रेल्वेची वाट पाहत होते. यातच फलाट क्र. १२ वर विशेष रेल्वेची घोषणा झाली. यामुळे १४ वरील प्रवाशी फलाट क्र. १२ कडे जाऊ लागले. यातून सदर चेंगराचेंगरीची घटना घडली. भाजपाचे अश्विनी वैष्णव राजीनामा देणार नाहीत कारण नैतिकताच शिल्लक राहिलेली नसल्याचे म्हटले आहे.वंदे भारत सारख्या रेल्वे गाड्यांचे श्रेय घेण्यासाठी भाजपाचे नेते पुढे असतात पण दिल्लीत घडलेल्या चेंगराचेंगरीची जबाबदारी घ्यायला ते मागे राहातात असेही दानवे म्हणाले आहेत.

### राहुल गांधीची टीका

"नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक लोकांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. मी शोकाकुल कुटुंबांप्रती माझ्या मनापासून सहानुभूति व्यक्त करतो आणि जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो. या घटनेमुळे पुन्हा एकदा रेल्वेचे अपयश आणि सरकारची असंवेदनशीलता समोर आली आहे. प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता, स्थानकावर चांगली व्यवस्था करायला हवी होती. सरकार आणि प्रशासनाने गैरव्यवस्थापन आणि निष्काळजीपणामुळे कोणालाही आपला जीव गमवावा लागू नये याची काळजी घ्यावी," अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिली.

---

# जयललिता यांचे दागिने सरकारकडे सुपूर्द

## 6 पेट्यांमध्ये भरले 24 कोटींचे दागिने, बेंगळुरूमधील एका विशेष न्यायालयाचे निर्देश

। बंगळुरू ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तमिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जे. जयललिता यांची २४ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता तमिळनाडू सरकारला सोपवण्यात आली आहे. जयललिता यांच्या संपत्तीमध्ये त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांचा देखील समावेश असून शनिवारी बेंगळुरूमधील एका विशेष न्यायालयाने ते तामिळनाडू सरकारकडे सुपूर्द केले आहेत.**



न्यायालयाने जयललिता यांच्या जप्त केलेली मालमत्ता तमिळनाडू सरकारला सोपवण्याचे निर्देश दिल्यानंतर शुक्रवारी हस्तांतरणांची प्रक्रिया सुरू करण्यात आली. सहा बंद पेट्यांमधील हे दागिने व्यवस्थित पोहोचवण्यासाठी सशस्त्र पोलिसांच्या तुकडीला जबाबदारी सोपवण्यात आली होती. माजी मुख्यमंत्री जयललिता यांच्या मृत्यूला आठ वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यानंतर हे दागिने सरकारला सोपवण्यात आले आहेत. एसपी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील या ताफ्यातील सहा वाहनांमध्ये ४० पोलीस कर्मचारी होते आणि सोने असलेला ट्रक मध्यभागी सुरक्षितपणे ठेवण्यात आला होता. जयललिता यांच्या दागिन्यांमध्ये सोन्याचा मुलामा दिलेली तलवार, एक मुकुट, ताट, कंबर पट्टा आणि जयललिता यांच्यासारखी दिसणारी मूर्ती, तसेच सोन्याचे घड्याळे, पेन, बांगड्या आणि कानातले यांचा समावेश होता. तसेच काही दागिने हे हिऱ्यांनी मढवलेले होते.जयललिता यांच्या चेन्नईतील पोएस गार्डन येथील निवासस्थानातून जप्त करण्यात आल्या होत्या आणि २००४ मध्ये बेंगळुरूला आणण्यात आल्या होत्या.

### सोन्याचं पुढे काय केलं जाणार?

मालमत्ता जमवल्याच्या प्रकरणाच्या सुनावणीसाठी बेंगळुरूमध्ये विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली होती.विशेष सरकारी वकील किरण एस. जावळी यांनी शनिवारी सांगितले की, तामिळनाडू सरकार सोने रिझर्व्ह बँकेत जमा केले जाऊ शकते किंवा मोजमाप केल्यानंतर त्या सोन्याचा लिलाव केला जाऊ शकतो. तसेच या खटल्यात खर्च झालेली रक्कम शशिकला यांच्या दंडातून वसूल केली जाईल आणि उर्वरित रक्कम राज्य सरकारला हस्तांतरित केली जाईल.

# उतेकर एकेकाळी शौचालय साफ करायचे

संपूर्ण देशभरात सध्या ‘छावा’ चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. विकी कौशलने साकारलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेचं सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. मात्र, या चित्रपटामागे सर्वात मोठं योगदान दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचं आहे असं विकी कौशलने अनेक मुलाखतींमध्ये सांगितलं आहे. जवळपास ४ वर्षे लक्ष्मण उतेकर व त्यांची टीम ‘छावा’साठी काम करत होती. विकी कौशलसमोर सुद्धा महाराजांची भूमिका साकारण्याआधी घोडेस्वारी आणि तलवारबाजी आलीच पाहिजे अशी अट लक्ष्मण उतेकरांना ठेवली होती. आज संपूर्ण बॉलीवूडमध्ये त्यांचं कौतुक केलं जात आहे पण, प्रत्यक्षात या मराठमोळ्या दिग्दर्शकाने प्रचंड मेहनत करून हे एवढं मोठं यश मिळवलं आहे. विकी कौशल व लक्ष्मण उतेकर यांचा एकत्र ‘छावा’ हा दुसरा चित्रपट आहे. यापूर्वी या दोघांनी ‘जरा हटके जरा बचके’ या चित्रपटासाठी एकत्र काम केलं होतं. त्याचवेळी दिग्दर्शकांनी विकीला ‘छावा’ची कल्पना दिली होती. अभिनेत्याने ‘द हॉलीवूड रिपोर्टर इंडिया’ला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शक लक्ष्मण उतेकरांचा प्रेरणादायी प्रवास उलगडला आहे. “लक्ष्मण उतेकरांनी इंडस्ट्रीत स्पॉटबॉय म्हणून काम करण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर ते असिस्टंट डीओपी झाले मग, डीओपी झाले त्यानंतर आज ते दिग्दर्शक आहेत” या त्यांच्या प्रवासाबद्दल विकीला प्रश्न विचारण्यात आला.विकी कौशल यावर म्हणाला, “लक्ष्मण सरांचा प्रवास हा कोणत्याही बायोपिकपेक्षा कमी नाहीये. कारण, स्पॉटबॉय म्हणून काम करण्याआधी ते एका ऑफिसमध्ये शिपाई म्हणून नोकरी करत होते. त्याठिकाणी ते वॉशरुम, शौचालय साफ करायचे. पुढे, ते शिवाजी पार्क येथे वडापाव विकायचे. त्यांनी तिथे वडापावची गाडी सुरू केली होती आणि आज लक्ष्मण सर छावाचे दिग्दर्शक आहेत. हा प्रवास माझ्यासाठी खूपच प्रेरणादायी आहे.”

# रोनित रॉयला बसमधून खाली ढकलले





‘लगान’(LAGAN) हा चित्रपट सर्वोत्कृष्ट सिनेमांपैकी मानला जातो. आमिर खानने या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली आहे. आशुतोष गोवारीकर यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.या चित्रपटात अपूर्व लाखिया यांनी आशुतोष गोवारीकर यांचे असिस्टंट म्हणून काम केले होते. अपूर्व लखिया यांची काम करण्याची पद्धत वेगळी होती. त्यांनी कलाकारांबाबत अनेक गोष्टी बदलल्या होत्या. ते सर्वांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत असत. सगळे त्यांना हिटलरही म्हणतही असत. आता यावर अपूर्व लाखिया यांनी एका मुलाखतीत वक्तव्य केले आहे.अपूर्व लाखिया यांनी नुकतीच फ्रायडे टॉकीजला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी लगान सिनेमाच्या शूटिंगदरम्यानचे किस्से सांगितले. त्यांनी म्हटले, “लगानच्या शूटिंगवेळी मी आमिरला सांगितले की कोणीही त्यांची खासगी गाडी आणणार नाही. सगळे कलाकार एकत्र एकाच बसने प्रवास करतील. त्यामुळे कोणालाही उशीर होणार नाही. आमिरने यावर मला सांगितले की आपल्या सिनेमात काही जेष्ठ कलाकारही आहेत. पण मी कोणतेही कारण ऐकून घेतले नाही. सर्वांनी एकाच बसने प्रवास करायचा असे ठरवले. जेव्हा सर्व कलाकार गुजरातमध्ये शूटिंगसाठी राहत होते. त्यावेळी मी प्रत्येक मजल्यावर मोठी घड्याळे लावली. मी त्यांना सांगितले की याच घड्याळातील वेळ सर्वांनी पाळली पाहिजे. मी सगळ्यांना सांगितले होते की अमुक वेळेला बस शूटिंगसाठी निघेल. पण, तिसऱ्या दिवशी आमिर खानला बसजवळ पोहोचायला उशीर झाला. बाकी सगळे आपापल्या जागेवर बसले होते. रोनित रॉय सिक्युरिटी सांभाळत होता. सगळे माझ्याकडे बघत होते. मी आता करणार, असा प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मला थोडी अस्वस्थतता वाटत होती. मात्र, मला माहित होते की मला एक उदाहरण तयार करायचे आहे.

# बॉलीवूड अभिनेत्री दुसऱ्यांदा आई होणार

‘बर्फी’, ‘दो और दो प्यार’सह अनेक चित्रपटांमध्ये काम करणारी बॉलीवूड अभिनेत्री इलियाना डिक्रुझ तिच्या पोस्टमुळे चर्चेत आहे. ३८ वर्षांच्या इलियानाने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोतून तिने दुसऱ्यांदा गरोदर असल्याचे संकेत दिले आहेत. पहिल्या मुलाच्या जन्मानंतर दीड वर्षांनी इलियाना दुसऱ्यांना आई होणार आहे.इलियाना डिक्रुझने पुन्हा आनंदाची बातमी दिली आहे. इलियाना पहिल्या बाळाच्या जन्मानंतर दीड वर्षांनी दुसऱ्यांदा आई होणार आहे. तिने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये एक फोटो पोस्ट केला आहे. मिडनाइट स्नॅक्सचा फोटो स्टोरीला शेअर करत तिने दिलेलं कॅप्शन चर्चेत आहे. या फोटोवर इलियानाने लिहिलं, ‘तुम्ही प्रेग्नंट आहेस हे न सांगता सांगा.’ इलियानाच्या या पोस्टने सर्वांचे लक्ष वेधून घेतले .

# अंकिता अडकली लग्नात


‘कोकण हार्टेड गर्ल’ अंकिता वालावलकरच्या घरी गेल्या काही दिवसांपासून लगीनघाई सुरू होती. साखरपुडा, मेहंदी, संगीत, हळद असे लग्नाआधीचे सगळे विधी पार पडल्यावर अंकिता वालावलकर व कुणाल भगत यांचा लग्नसोहळा कोकणात थाटामाटात पार पडला आहे. ‘कोकण हार्टेड गर्ल’ने तिच्या लग्नाचे फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करत ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. ‘बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वात अंकिता सहभागी झाली होती. शोमध्ये असतानाच तिने लवकरच लग्न करणार असल्याचं जाहीर केलं होतं. गेल्यावर्षी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर अंकिताने कुणालबरोबरचा पहिला फोटो सोशल मीडियावर शेअर केला. यानंतर ‘कोकण हार्टेड गर्ल’चे सगळे चाहते तिच्या लग्नाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर प्रेक्षकांच्या लाडक्या अंकिताने आता वैयक्तिक आयुष्यात एका नव्या प्रवासाची सुरुवात केली आहे.अंकिताचा विवाहसोहळा राजेशाही थाटात व पारंपरिक पद्धतीने कोकणात पार पडल्याचं फोटोंमध्ये पाहायला मिळत आहे. अंकिताने लग्नात पिवळ्या रंगाची सुंदर अशी साडी नेसली होती. हातात हिरवा चुडा, मुंडावळ्या, गळ्यात मोठा नेकलेस असा लूक ‘कोकण हार्टेड गर्ल’ने विवाहसोहळ्यात केला होता. तर, तिचा पती कुणाल भगतने सुद्धा लग्नात मराठमोळा लूक केला होता.अंकिताने लग्नाचे फोटो शेअर करत याला “वालावलकरांचो थोरलो जावई” ( वालावलकरांचा सर्वात मोठा जावई ) असं कॅप्शन दिलं आहे.



# प्रतीक बब्बरने लग्नात न बोलावल्याने सावत्र भाऊ नाराज

बॉलीवूड अभिनेता प्रतीक बब्बरने त्याची गर्लफ्रेंड प्रिया बॅनर्जीशी शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) व्हॅलेंटाईन डेला लग्न केलं. प्रतीकने त्याची दिवंगत आई स्मिता पाटील यांच्या मुंबईतील घरी एका खासगी समारंभात दुसरं लग्न केलं. पण, प्रतीकने त्याचे वडील राज बब्बर आणि सावत्र भावंडं आर्या आणि जुही यांना लग्नाचं आमंत्रण दिलं नाही. आर्यने याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. आर्य म्हणाला की प्रतीकला त्याच्या आयुष्यातील सर्वात खास दिवसासाठी कुटुंबियांना आमंत्रित करावं वाटलं वाटलं नसेल तर मग एक कुटुंब म्हणून हे आमचं अपयश आहे. त्याने लग्नात बोलावलं नाही, यामुळे वडील राज बब्बर दुखावले आहेत, असंही आर्यने नमूद केलं. प्रतीक हा राज आणि दिवंगत अभिनेत्री स्मिता पाटील यांचा मुलगा आहे. तर आर्य आणि जुही ही राज आणि नादिरा बब्बर यांची मुलं आहेत.राज





बब्बर यांचा मोठा मुलगा आर्य बब्बर त्याचा सावत्र भाऊ प्रतीक बब्बरबद्दल म्हणाला, “कुठेतरी एक कुटुंब म्हणून आम्ही कमी पडलो.” प्रतीकने व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी लग्न केलं. या लग्नात त्याची पत्नी प्रिया बॅनर्जीचे कुटुंबीय होते व दोघांचे काही जवळचे मित्र-मैत्रिणी उपस्थित होते. मात्र बब्बर कुटुंबातील एकाही सदस्याला प्रतीकने या लग्नाचं निमंत्रण दिलं नाही. आर्य म्हणाला, “आमच्या कुटुंबातील इतर सदस्यांना, माझी आई (नादिरा बब्बर), माझी बहीण (जुही बब्बर) किंवा मला लग्नाला न बोलावणं समजू शकतो. कदाचित आम्ही एक कुटुंब म्हणून कुठेतरी कमी पडलो असू. पण आम्ही त्याला कधीही सावत्र भाऊ मानलं नाही. पण ठिके. कदाचित, आमच्याकडून काही चूक झाली असेल. पण पप्पा? पप्पांना लग्नाचं निमंत्रण दिलं नाही. ते त्याचेही वडील आहेत. तो असं कसं करू शकतो? पप्पा खूप दुखावले आहेत. असं करून प्रतीकने त्याच्या आई स्मिता पाटीलजींनाही दुखावलं आहे. जर त्याने क्षणभर याचा विचार केला तर त्याला कळेल की त्याची आई, ज्यांचा तो खूप आदर करतो आणि प्रेम करतो; त्यांनाच त्याने दुखावलं आहे.


# आयपीएल 2025 चे वेळापत्रक जाहीर!

## पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात खेळला जाईल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२५ चे वेळापत्रक १६ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आले आहे. चाहत्यांची प्रतीक्षा संपली आहे. ही स्पर्धा २२ मार्चपासून सुरू होत आहे. ही स्पर्धा १३ ठिकाणी खेळवली जाईल. पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात खेळला जाईल. हा सामना कोलकाता येथे खेळला जाईल.**

याशिवाय, दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाणार आहे. त्याचबरोबर ५ वेळचे विजेते चेन्नई सुपर आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना २३ मार्च रोजी खेळला जाईल. दोन्ही संघांचे चाहते प्रचंड आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे खेळला जाईल. या स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जातील. २३ मार्च रोजी पहिला सामना एसआरएच आणि आरआर यांच्यात खेळला जाईल. यानंतर, दुसरा सामना चेन्नई आणि मुंबई यांच्यात संध्याकाळी ७:३० वाजता खेळला जाईल. या हंगामात लीग टप्प्यात सीएसके आणि चेन्नई दोनदा आमनेसामने येतील. त्याच वेळी, ७ एप्रिल रोजी आरसीबी आणि मुंबई यांच्यात फक्त एकच लीग सामना खेळला जाईल. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. आयपीएल २०२५ चा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाईल. सुरुवातीचे आणि अंतिम सामने दोन्ही कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होतील.ही जगप्रसिद्ध लीग १३ शहरात आयोजित केली जाईल. आयपीएल २०२५ मध्ये ६५ दिवसांत एकूण ७४ सामने खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये, लीग सामने २२ मार्च ते १८ मे दरम्यान खेळवले जातील. यानंतर, २०, २१, २३ आणि २५ मे रोजी प्लेऑफ सामने आयोजित केले जातील आयपीएल २०२५ मध्येही गेल्या वर्षीप्रमाणेच फॉरमॅट आहे. या दोन महिन्यांच्या स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स, कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, सनरायझर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स हे १० आयपीएल संघ विजेतेपद जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील.आयपीएल २०२४ प्रमाणेच फॉरमॅट आहे. त्यानुसार १० संघांची दोन गटात विभागणी केली आहे. प्रत्येक संघ लीग टप्प्यात १४ सामने खेळेल. पॉइंट टेबलमधील अव्वल दोन संघ पहिल्या क्वालिफायरमध्ये भिडतील, तर तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकाच्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना खेळला जाईल. पहिल्या क्वालिफायरमध्ये पराभूत संघ आणि एलिमिनेटरमध्ये जिंकणारा संघ दुसऱ्या क्वालिफायरमध्ये भिडेल. येथील विजेता संघ पहिल्या क्वालिफायरमधील विजेत्या संघाविरुद्ध अंतिम फेरीत पोहोचेल. लखनौ सुपर जायंट्स, पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अलीकडेच त्यांचे कर्णधार जाहीर केले. २७ कोटी रुपयांना करारबद्ध झालेला ऋषभ पंत सुपर जायंट्सचे नेतृत्व करेल तर २६.७५ कोटी रुपयांना निवडलेला श्रेयस अय्यर किंग्जचे नेतृत्व करेल. आरसीबीने रजत पाटीदारला त्यांचा नवीन कर्णधार म्हणून घोषित केले. फक्त दोन संघ दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांनी अद्याप आयपीएल २०२५ साठी त्यांच्या कर्णधाराची घोषणा केलेली नाही.




### 65 दिवसांत एकूण 74 सामने

हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. आयपीएल २०२५ चा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाईल. सुरुवातीचे आणि अंतिम सामने दोन्ही कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होतील.ही जगप्रसिद्ध लीग १३ शहरात आयोजित केली जाईल. आयपीएल २०२५ मध्ये ६५ दिवसांत एकूण ७४ सामने खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये, लीग सामने २२ मार्च ते १८ मे दरम्यान खेळवले जातील. यानंतर, २०, २१, २३ आणि २५ मे रोजी प्लेऑफ सामने आयोजित केले जातील आयपीएल २०२५ मध्येही गेल्या वर्षीप्रमाणेच फॉरमॅट आहे. या दोन महिन्यांच्या स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स, कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, सनरायझर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स हे १० आयपीएल संघ विजेतेपद जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील.आयपीएल २०२४ प्रमाणेच फॉरमॅट आहे. त्यानुसार १० संघांची दोन गटात विभागणी केली आहे.

# टीम इंडियाचा सध्या कागदावर मजबूत

## गंभीर -आगरकरमध्ये 3 खेळाडूंवरून वाद?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ दुबईला पोहोचला आहे. त्यांचा पहिला सामना २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध होणार आहे. कागदावर हा संघ खूप मजबूत दिसत आहे आणि तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की रोहित शर्मा कर्णधार म्हणून आणखी एक आयसीसी ट्रॉफी जिंकू शकतो. इंग्लंडविरुद्ध सलग तीन एकदिवसीय सामने जिंकून टीम इंडियाने आपली ताकद दाखवून दिली आहे.**



दरम्यान, संघ निवडीबाबत एक खळबळजनक खुलासा झाला आहे. यामुळे क्रिकेटप्रेमींना आश्चर्य वाटले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, निवडसमितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर संघ निवडीशी संबंधित अनेक निर्णयांवर एकमत नव्हते. निवड बैठकीत दोघांमध्ये बराच वेळ वादविवाद झाला. काही खेळाडूंच्या निवडीबाबत दोघांमध्ये बरीच चर्चा झाली. श्रेयस अय्यरच्या आगमनाने मधल्या फळी अधिक मजबूत झाली आहे, परंतु गौतम गंभीरने स्पष्टपणे सांगितले आहे की तो डाव्या-उजव्या संयोजनासाठी मधल्या फळीत सतत बदल करू शकतो.

अशा परिस्थितीत संघात कोणाचाही फलंदाजीचा क्रम निश्चित असणार नाही. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत अय्यर मधल्या फळीत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. डाव्या-उजव्या टॉप-ऑर्डर लाइन-अपसह प्रयोग करण्यासाठी भारताने त्याला पहिल्या सामन्यात वगळण्याचा विचार केला असला तरी, त्याने दोन अर्धशतके झळकावत ६०.३३ च्या सरासरीने १८१ धावा केल्या. टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, निवड समितीच्या बैठकीत अय्यरला संघात कायम ठेवण्याबाबत बरीच चर्चा झाली.या अहवालात पुढे असे दिसून आले आहे की गंभीरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ व्यवस्थापनाने केएल राहुलला पाठिंबा देऊन अजित आगरकरच्याविरुद्ध भूमिका घेतली. गेल्या महिन्यात चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान पत्रकार परिषदेत आगरकरने आयसीसी स्पर्धा आणि इंग्लंड वनडे मालिकेसाठी पंतची पहिली पसंती असलेला यष्टीरक्षक म्हणून पुष्टी केली होती. पण रोहित आणि गंभीर दोघांनीही सातत्य राखण्याचे आवाहन केले. कारण राहुल इंग्लंडविरुद्धच्या तिन्ही सामन्यांमध्ये खेळला होता. श्रेयस अय्यरच्या आगमनाने मधल्या फळी अधिक मजबूत झाली आहे, परंतु गौतम गंभीरने स्पष्टपणे सांगितले आहे की तो डाव्या-उजव्या संयोजनासाठी मधल्या फळीत सतत बदल करू शकतो.

# गुजरात जायंट्सचा ऐतिहासिक विजय!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या डब्ल्यूपीएल २०२५ च्या तिसऱ्या सामन्या गुजरात जायंट्सने ऐतिहासिका विजय नोंदवला. गुजरात जायटंस्ने प्रथमच लक्ष्याचा पाठलाग करताना विजय मिळवला. गुजरात जायंट्सने यूपी वॉरियर्सविरुद्ध ६ विकेट्सनी दणदणीत विजय नोंदवला.

या सामन्यात उत्तर प्रदेशने प्रथम फलंदाजी करत १४३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, गुजरात संघाने १२ चेंडू शिल्लक असताना ६ विकेट्सने सामना जिंकला. गुजरातच्या विजयात सर्वात मोठे आणि महत्त्वाचे योगदान कर्णधार ॲशले गार्डनरचे होते, जिने फलंदाजीत ५२ धावा केल्या आणि गोलंदाजीतही २ विकेट्स घेतल्या. यासह गुजरात जायंट्सने लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्यांदाच विजयावर शिक्कामोर्तब केला. या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्णधार ॲशले गार्डनरचा हा निर्णयही बरोबर ठरला.गुजरातच्या घातक गोलंदाजीसमोर, यूपी वॉरियर्सने ७८ धावांपर्यंत ५ विकेट गमावल्या होत्या. यानंतर कर्णधार दीप्ती शर्मा आणि उमा छेत्री यांच्या २४ धावांच्या खेळीमुळे उत्तर प्रदेश संघाने कसा तरी १४३ धावांचा टप्पा गाठला. गुजरातकडून गोलंदाजी करताना प्रिया मिश्राने कहर केला आणि ३ बळी घेतले. यानंतर १४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, गुजरात जायंट्सची सुरुवात खराब झाली. कारण बेथ मुनी आणि दयालन हेमलता यांनी २ धावांच्या आतच आपले विकेट गमावले.

## समाजसेवेत येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी

# ‘संघर्षयोद्धा’ हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; संघर्षयोद्धा’ पुस्तकाचे प्रकाशन समारंभ

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**खासदार श्रीरंग बारणे यांचा नगरसेवक ते महासंसदरत्न खासदार हा संघर्ष पाहिला तर त्यांना दिलेली संघर्षयोद्धा ही उपाधी समर्पक आहे. समाजसेवेत येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ‘संघर्षयोद्धा’ हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. ही जीवनगाथा असून खडतर प्रवास त्यात आहे. सर्वांनी हे पुस्तक वाचावे. मी खासदार बारणे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. खासदार बारणे यांनी लोकांचा विश्वास कमविला आहे. त्यांना जनता कधी अंतर देणार नाही. मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही, असेही शिंदे म्हणाले.**




खासदार श्रीरंग बारणे यांचा नगरसेवक ते महासंसदरत्न खासदार हा संघर्ष पाहिला तर त्यांना दिलेली संघर्षयोद्धा ही उपाधी समर्पक आहे. समाजसेवेत येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ‘संघर्षयोद्धा’ हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. ही जीवनगाथा असून खडतर प्रवास त्यात आहे. सर्वांनी हे पुस्तक वाचावे. मी खासदार बारणे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. खासदार बारणे यांनी लोकांचा विश्वास कमविला आहे. त्यांना जनता कधी अंतर देणार नाही. मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही, असेही शिंदे म्हणाले.

#### खा. बारणे यांच्या 61 व्या वाढदिवसानिमित्त पुस्तक प्रकाशन

श्रीरंग आप्पा बारणे सोशल फाउंडेशनच्या वतीने शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या 61 व्या वाढदिवसानिमित्त ‘संघर्षयोद्धा’ या पुस्तकाचे प्रकाशन श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त स्वामी गोविंदगिरी महाराज आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात रविवारी झालेल्या कार्यक्रमाला केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार विजय शिवतारे, सुनील शेळके, महेंद्र थोरवे, राहुल कुल, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे, शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, नाना काटे, प्रशांत शितोळे, प्रमोद कुटे, निलेश बारणे, शत्रुघ्न काटे, सदाशिव खाडे, शीतल शिंदे, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, जयश्री गावडे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजित बारणे उपस्थित होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, मावळरत्न खासदार श्रीरंग बारणे यांनी जनसेवा, समाजसेवेचा यज्ञ मांडला आहे. त्यांची कारकीर्द संघर्षाची आहे. नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष आणि थेट खासदार झाले. बहुमत नसताना स्थायी समिती अध्यक्ष झाले. जमिनीवरचा कार्यकर्ता खासदार झाला. त्यांना जनतेचे प्रश्न, त्यांच्या अडचणींची जाणीव असते. लोकभावनेची ते कदर करतात. खासदार बारणे लेखकही असून पाच पुस्तक लिहिली आहेत. मतदारसंघातील जनतेची कामे करतात. त्यांनी माझ्याकडे वैयक्तिक कामे कधी आणली नाहीत. ते कार्यकर्ता जपतात, त्यांना बळ देतात. कार्यकर्ते कुटुंबाची पर्वा न करता काम करतात. अशा कार्यकर्त्यांमुळे महायुतीला मोठे यश मिळाले. हे काम खासदार बारणे अचूकपणे काम करतात. त्यांचा अंदाज अचूक असतो. त्यांना दांडगा विश्वास होता. फेक नरेटिव्ह लोकसभेला असतानाही खासदार बारणे यांचा विश्वास आणि अंदाज खरा ठरला.



नगरसेवक ते महासंसदरत्न हा संघर्ष पहिला तर त्यांना दिलेली संघर्षयोद्धा ही उपाधी समर्पक आहे. समाजसेवेत येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ‘संघर्षयोद्धा’ हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. सर्वांनी हे पुस्तक वाचावे. ही जीवनगाथा आहे. खडतर प्रवास त्यात आहे. मी खासदार बारणे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे. सर्वांना काही पाहिजे हे पाहणारा खासदार बारणे आहेत. त्यांनी मावळवर भगवा फडकवित ठेवला. मतदारसंघावर त्यांची चांगली पकड आहे. त्यामुळे तीनदा निवडून आले. त्यांनी भल्याभल्याना अस्मान दाखविले. जनता त्यांच्या पाठीशी आहे. संसदरत्न, महासंसदरत्न, विशेष संसदरत्न असे आठ पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. याचा महाराष्ट्राला अभिमान आहे.

#### मावळ या देशाचा तारणहार

राजकारण हे समाज सेवेचे माध्यम आहे. लोकांसाठी राजकारण, समाजकारण करत असून खुर्चीसाठी करत नाही. पदे, येतात जातात, वर-खाली होतात. मुख्यमंत्री कधीच स्वतःला समजलो नाही. कॉमन मॅन होतो. लाडक्या बहिणीचा लाडका भाऊ ही ओळख माझ्यासाठी सर्वात वरची आहे. सरकारने सुरू केलेल्या एकही योजना बंद केली जाणार नाही. सत्तेला लाथ मारून आम्ही सर्वांनी उठाव केला. 40 आमदार माझ्यासोबत आले. अयोध्येत राम मंदिर बांधण्याचे 500 वर्षाचे स्वप्न, 370 कलम रद्द करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी पूर्ण केले. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण केले. मला पुरस्कार मिळाल्याने अनेकांना पोटदुखी झाली आहे. अडीच वर्षे झाले तरी पोटदुखी थांबत नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, माझ्यासाठी दिल्ली नवीन आहे. पण, जेष्ठ सहकारी असलेले खासदार बारणे यांच्याकडून मी दिल्लीत शिकत आहे. संसदेत सक्रिय सहभाग, मतदारसंघातील प्रश्न ते पोटतिडकीने मांडतात. सर्वांना सोबत घेऊन काम करतात. दिल्लीत त्यांचे सर्वांशी चांगले संबंध आहेत. तळागाळातून ते पुढे आले असून समाजातील सर्वांसाठी काम करत आहेत. गोविंदगिरी महाराज म्हणाले, भगवा झेंडा खांद्यावर घेऊन फडकवित ठेवणाऱ्या प्रत्येकाचा पाईक होण्यात मी धन्यता मानतो. धर्माचे पहिले प्रकाशन म्हणजे अयोध्येचा प्रभू श्रीराम आणि दुसरी आवृत्ती छत्रपती शिवाजी महाराज आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र प्रत्येकाने अभ्यासले पाहिजे. या राष्ट्राची संजीवनी छत्रपती शिवाजी महाराज आहेत. जपानमध्ये महाराजांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. समाजाची धग ज्याच्यापर्यंत पोहोचते, तो खरा नेता असतो. धर्माचा राजकारणाशी संबंध नसावा असे कधीच नसते. लोकांच्या जीवनाचा उदय होण्यासाठी पाठिशी उभे राहणारे खासदार श्रीरंग बारणे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला येण्याची मला संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. न थकणारा, न थांबणारा, न झुकणारा हा मावळ या देशाचा तारणहार आहे.

### 30 वर्षातील सर्व अनुभव पुस्तकात : बारणे

खासदार बारणे म्हणाले, महापालिकेत 20 वर्षे नगरसेवक म्हणून काम केले. 11 वर्षांपासून लोकसभेत काम करत आहे. पाचवेळा महापालिका, तीनवेळा लोकसभा निवडणूक जिंकलो. स्थायी समितीची निवडणूक 42 दिवस चालली. बहुमत नसतानाही एक मताने मी स्थायी समितीचा अध्यक्ष झालो. लोक जोडले, संघर्षही झाला आहे. राजकारणात कोणी कोणाचा मित्र आणि शत्रू नसतो. पक्ष, कार्यकर्त्यांच्या बळावर मी मोठा झालो. कोणताही मोठा राजकीय वारसा नसताना मला देशाच्या लोकसभेत काम करायला मिळाले. अनेक नेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली. निवडणुकीसह 30 वर्षातील सर्व अनुभव पुस्तकात मांडले आहेत. लोकसभेतील कामकाजासंदर्भातील पुस्तक देखील मी काढले आहे. अनधिकृत बांधकामे सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. माझ्यावर गुन्हे दाखल झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वजित बारणे यांनी केले. भाऊसाहेब कोकाटे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीरंग आप्पा बारणे सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष धनाजी बारणे, उपाध्यक्ष रवी नामदे, सचिव बाळासाहेब वाघमोडे, कार्यवाह विश्वजित बारणे यांनी संयोजन केले.



Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046



EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# अद्वितीय उत्साहात पिंपरी चिंचवड विद्यापीठाचा 'अनंतम २०२५' सांस्कृतिक सोहळा उत्साहात

## दोन दिवस सोहळ्यामध्ये कला, संस्कृती आणि राष्ट्रीय ऐक्याचा भव्य उत्सव

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

भारताला शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृतीचा मोठा वारसा आहे. या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी विद्यार्थी जोडले जावेत यासाठी अनंतम सारखे सांस्कृतिक सोहळे झाले पाहिजेत असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे 'अनंतम २०२५' हा वार्षिक सांस्कृतिक सोहळा प्रमुख सेलिब्रिटींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दोन दिवस चाललेल्या या वार्षिक सोहळ्यामध्ये कला, संस्कृती आणि राष्ट्रीय ऐक्याचा भव्य उत्सव अनुभवायला मिळाला. या सोहळ्याच्या आयोजनात ७५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तर ३,००० पेक्षा जास्त प्रेक्षकांनी उपस्थिती राहून सहभागी कलाकारांचा उत्साह वाढविला. पहिल्या दिवशी 'सैराट' चित्रपटातील मुख्य कलाकार आकाश ठोसर याने विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत कार्यक्रमाची रंगत वाढवली. सांस्कृतिक कार्यक्रम हे विद्यार्थी व्यक्तिमत्त्वविकास, आत्मविश्वास आणि सामाजिक कौशल्ये जोपासण्याचे महत्त्वाचे माध्यम असल्याचे आकाश ठोसर याने सांगितले. दुसऱ्या दिवशीची रंगत 'नटरंग' मधील अभिनय व 'अप्सरा आली' या गाण्यासाठी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. सोनालीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य आणि पराक्रमाला वंदन करणारे 'शिव गर्जना' सादर करून उपस्थितांना भारावून टाकले. विद्यार्थ्यांसोबत नाच, गाणी आणि मुक्त संवाद साधत या दोन्ही कलाकारांनी उत्सवाला खराखुरा सोहळ्याचा बाज दिला. पीसीयूने अवघ्या दोन वर्षांत ३,००० हून अधिक विद्यार्थ्यांचे शिक्षण देऊन शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर भरारी घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच समाज आणि राष्ट्राच्या विकासातही मोठे योगदान आहे असे पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी विविध राज्यांतील लोकनृत्ये व संगीताचे सादरीकरण करून भारताच्या संस्कृतीची विविधता सादर केली हे आपल्या देशाच्या बहुरंगी संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. दोन वर्षात पीसीयूला मिळालेली अनेक मानांकने व पुरस्कार अभिमानास्पद आहे असे प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे यांनी सांगितले. अशा जल्लोषपूर्ण वातावरणातून एकोप्याची भावना वृद्धिंगत होते, ज्यामुळे सर्वांनाच दीर्घकालीन यशासाठी प्रेरणा मिळते असे अभिनेत्री सोनारी कुलकर्णी हिने सांगितले.

### यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या

पिंपरी चिंचवड विद्यापीठ कुलपती हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.